MHKO100013312023

**नियमीत दिवाणी दावा क्र. २४१/२०२३**

निगोंडा बसगोंडा पाटील.
विरुध्द
विरगोंडा बसगोंडा पाटील.

**निशाणी क्रमांक ५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीने हजर होऊन त्याचा खुलासा दाखल न केल्याने त्याचेविरुध्द विना कैफियत आदेश पारीत करणेत आला व प्रस्तुतचा अर्ज त्याचे म्हणण्याशिवाय चालविणेत आला.

२. अर्जाचे अवलोकन केले. वादीच्या वकीलाचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे युक्तीवादाकरीता वारंवार पुकारा केला असता गैरहजर. वादीचे कथनांवरुन खालील प्रश्न काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने असे शाबीत केले काय की, त्याच्या म्हणण्यात प्रथमदर्शनी तथ्य आहे ? | होय. |
| २. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, न्यायाचा समतोल त्याचे बाजुने आहे ? | होय. |
| ३. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, अर्ज मंजुर न केल्यास त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | होय. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करणेत येतो. |

**कारणमिमांसा**

**दावा मिळकतीचे वर्णन-**

३. मौजे खमलेहट्टी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथील भुमापन गट क्र.७२ क्षेत्र ०१ हेक्टर १८ आर, आकार १७ रुपये ७५ पैसे यापैकी उत्तरेकडील ०० हेक्टर ५९ आर, आकार ०८ रुपये ८८ पैसे यासी चतुःसिमा पुढीलप्रमाणे -

पूर्वेस - ओढा,

पश्चिमेस - भोसले यांची शेतजमीन मिळकत,

दक्षिणेस - सदर भूमापन गट क्र.७२ पैकी उर्वरित प्रतिवादी यांच्या हिस्सेचे क्षेत्र,

उत्तरेस - बाळू माने यांची शेजमीन मिळकत.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही या अर्जाचा विषय होय. (यापुढे या मिळकतीस "दावा मिळकत" म्हणून संबोधण्यात येईल).

४. वादीने त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.३, ७, १३ व १६ येथे खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केलेली आहेतः-

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ०१. | खाते क्र.८०५ सन २०२३-२४ सालचा ८-अ उतारा. |
| ०२. | गट क्र.७२ चा सन २०२३-२४ सालचा ७/१२ उतारा. |
| ०३. | दिनांक ३०/१२/२०१४ रोजीचे हक्कसोडपत्राची प्रत. |
| ०४. | दुय्यम निबंधक, गडहिंग्लज यांचेकडील दस्त क्र.१६२४/२०२१ ची प्रत. |
| ०५. | दुय्यम निबंधक, गडहिंग्लज यांचेकडील दस्त क्र.४२२८/२०१४ ची प्रत. |
| ०६. | बसगोंडा निगोंडा पाटील यांचे मृत्यू प्रमाणपत्र. |
| ०७. | दिनांक ०७/०६/२०२१ रोजीचे करारपत्राची छायांकित प्रत. |
| ०८. | फेरफार क्र. १४१२ चा फेरफार उतारा. |
| ०९. | साक्षीदार जोतीबा मारुती माने यांचे प्रतिज्ञापत्र. |
| १०. | गट क्र.६९/ब चा सन २०२३-२४ सालचा ७/१२ उतारा. |
| ११. | साक्षीदार प्रकाश मारुती गुडसे यांचे प्रतिज्ञापत्र. |
| १२. | साक्षीदार किरण बाबुराव गवळी यांचे प्रतिज्ञापत्र. |
| १३. | गट क्र.७२ चा गटनकाशा. |
| १४. | गट क्र.७२ चा वहिवाटीप्रमाणे नकाशा. |
| १५. | दिनांक ०७/०६/२०२१ रोजीचे करारपत्राची छायांकित प्रत. |
| १६. | गट क्र.७० चा सन २०२३-२४ सालचा ७/१२ उतारा. |

५. प्रतिवादी विरुध्द विना कैफियत आदेश झालेने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल नाही.

**प्रश्न क्रमांक १ ते ३ करिताः -**

६. वरील सर्व प्रश्न हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांचेवर एकत्रीतपणे चर्चा करण्यात येत आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मिळकत आहे. दावा मिळकतीमधील वादी व प्रतिवादी यांची आई दूंडव्वा, बहिणी शोभा व महादेवी आणि प्रतिवादी विरगोंडा यांनी त्यांना वारसाहक्काने प्राप्त झालेला हिस्सा वादीचे लाभात कायम मालकी हक्काने दिनांक ३०/१२/२०१४ रोजीचे नोंदणीकृत हक्कसोडपत्राने सोडून दिलेला आहे. सदर हक्कसोडपत्रानुसार गावचे कागदोपत्री फेरफार क्र.१०७० ची नोंद होऊन ७/१२ पत्रकी वादीचे नांवाची नोंद झालेली आहे. त्यानुसार, दावा मिळकत ही वादीचे कब्जेवहिवाटीत असून वादी हाच दावा मिळकत कसून वहिवाटीत आहे. तसेच, दावा मिळकतीच्या दक्षिणेकडील ५९ आर मिळकत ही प्रतिवादी यांच्या मालकीची असून प्रतिवादीने त्यापैकी ५ आर चे क्षेत्र शिवाजी माने व राजकुमार माने यांना विक्री केली असून उर्वरित ५४ आर क्षेत्र हे भिमगोंडा शटगोंडा पाटील यांना ५ वर्षे मुदतीकरीता करारनाम्याने भोगवटयास दिलेले आहे. त्यामुळे, दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा कोणताही हक्कसंबंध नाही.

७. वादी हा दावा मिळकतीमध्ये श्रीशैल चौगुले व इतरांच्या मदतीने पिकाच्या लागणीकरीता आक्टोबर २०२३ च्या दुस-या आठवडयात नांगरणीस गेला असता प्रतिवादीने सदर नांगरणीस हरकत करुन हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. वादीने प्रतिवादीस समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादी काही एक ऐकण्यास तयार नाही. याऊलट, वादीस मला कसवणूकीस शेतजमीन नाही, ही आमची वडीलार्जीत मिळकत आहे, मी जमीन कसणारच असे म्हणून हरकतीचे बेकायदेशिर कृत्य चालू ठेवले आहे. त्यामुळे, वादीने प्रतिवादीचे विरुध्द त्याने वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये व हुसकावून लावू नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकूमाची विनंती केली आहे.

८. वादीच्या कथनाच्या पृष्टयर्थ दाखल दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा मिळकत ही वादीचे नांवे नमुद आहे. तसेच, दिनांक ३०/१२/२०१४ रोजीचे नोंदणीकृत हक्कसोडपत्रानुसार प्रतिवादी विरगोंडा, महादेवी डोणेवाडी, शोभा हंजी व दूंडव्वा पाटील यांनी त्यांना वारसाहक्काने प्राप्त झालेला हिस्सा

वादीचे लाभात सोडून दिलेला आहे. तसेच, दावा मिळकत गट क्र.७२ मधील प्रतिवादीचे नांवे असलेले ५९ आर क्षेत्रापैकी ५४ आर क्षेत्राचा प्रतिवादीने भिमगोंडा पाटील यांचेसोबत ५ वर्षे मुदतीने भोगवटा करणेसाठी करार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, वादीने कथन केलेनुसार दावा मिळकत ही त्याचे मालकीची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादीने त्याची कैफियत दाखल केलेली नसल्यामुळे व वादीचे कथन खोडून काढण्याइतपत इतर कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नसल्यामुळे प्रथमदर्शनी वादीचे कथनात तथ्य दिसुन येते.

९. वादीने मागणी केली आहे की, प्रतिवादीने त्याचे दावा मिळकतीत असलेल्या मालकी हक्काने कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये. याबाबत, वादीने प्रस्तुत अर्जामध्ये वादी हा दावा मिळकतीत नांगरणीस गेला असता प्रतिवादीने हरकत अडथळा केल्याचे नमुद केले आहे. सदर कथनाच्या समर्थनार्थ वादीने साक्षीदार प्रकाश गुडसे व किरण गवळी यांची शपथपत्रे दाखल केलेली आहेत. याऊलट, प्रतिवादीतर्फे कैफियत अथवा कोणताही पुरावा अभिलेखावर नसल्याने वादीचे कथन खोडून काढण्याइतपत कोणताही पुरावा दाखल नसल्यामुळे वादीचे कथनात प्रथमदर्शनी तथ्य दिसून येते. त्यामुळे, वादीने मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादीविरुध्द मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, दावा मिळकत केवळ वादीचे नांवे असल्याने प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून माझे मते न्यायिक समतोल हा वादीच्या लाभात आहे. सबब मी प्रश्न क्र.१ ते ३ चे होकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ४ करिताः</u>**-

१०. प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचा व वरील सर्व कारणांचा विचार करता वादीने मागणी केलेप्रमाणे प्रतिवादीने दावा मिळकत मध्ये वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम देता येईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करिता प्रश्न क्रमांक ४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**०२.** प्रतिवादीने दावा मिळकत ज्याचे वर्णन दाव्याच्या परिच्छेद क्र.१ मध्ये नमुद आहे त्यावर स्वतः अथवा त्याचे मार्फत इतर कोणीही प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये असा त्याचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात येतो.

**०३.** अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

सही/-

दिनांकः १२/०१/२०२४.
गडहिंग्लज.

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 12/01/2024 |
| Order signed by P.O. on | 12/01/2024 |
| Order uploaded on | 12/01/2024 |